## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक-१७२/२०१८/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| बाळासाहेब रावजी सोनवणे | निवासी नायब तहसीलदार(महसूल ), तहसील कार्यालय हवेली, जि पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ खडकमाळ आळी ,पुणे |

(निर्णय दि.१२.०५.२०२६)

तक्रारदार यांचा कलम-१८ अंतर्गत तक्रार अर्ज दि. १९.०५.२०१८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाला आहे. तक्रारदार यांनी या तक्रार अर्जाद्वारे द्वितीय अपील क्रमांक ४०९०,४०९२/२०१६ याप्रकरणी आयोगाने दिलेला निर्णय मान्य नाही , जन माहिती अधिकारी माहिती अधिकार अर्जाची दखल घेत नाही, तहसीलदार हवेली व उपविभागीय अधिकारी हवेली या कार्यालयात मनमानी स्वरूपात कामकाज करण्यात येत असून शेत जमीन घोटाळा आहे, द्वितीय अपील क्रमांक ४४७२, ४४८५, ४४९१, ४४९२, ४४९३, ४४९४, ४४९५/ २०१६ मध्ये मागणी केलेले मौजे जांभळी तालुका हवेली पुणे या गावचे माहिती अर्जानुसार संपूर्ण पेपर देण्याचे आदेश द्यावेत अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार प्रकरणी उपलब्ध अभिलेखावरून असे दिसून येते की द्वितीय अपील क्रमांक ४०९०,४०९२/२०१६ याप्रकरणी आयोगाने दिनांक २६.४.२०१८ रोजी सुनावणी घेऊन अपीलार्थी यांना माहिती पुरवलेली असल्याने द्वितीय अपील निकाली काढली आहेत. तसेच अन्य प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी सन १९३० पासून १९७३-१९७४ या कालावधीची माहिती मिळावी अशी मागणी केली आहे. सदर माहिती अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला असून मागणी केलेल्या माहितीचे शुल्क रु. ६२७२/- भरण्याबाबत तक्रारदार यांना कळविले आहे तसेच त्यांना उपलब्ध असलेली माहितीचे प्रदान करण्यात आले आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता सदर तक्रार प्रकरणी आयोगाच्या स्तरावर कार्यवाही अपेक्षित नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक -१७२/२०१८/पुणे

जावक क्र- 2257 दिनांक- 13/5/2026